श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास
(महाराष्ट्र शासन नियंत्रित)
एस.के.बोले मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२८
दुरध्वनी : ०२२-२४२२४४३८ । २४२२१५५८
ईमेल : admin@siddhivinayak.org । info@siddhivinayak.org
वेब : www.siddhivinayak.org

श्रीसिध्दिविनायक

क्र. सिविगमं आस्था.–२०२५/कार्या.०३/१२९ दि. २८ जानेवारी, २०२५

प्रति,
मा. संपादक

महोदय,

सदर मजकूर प्रसिध्दिसाठी पाठवीत आहोत.

कळावे,

आपला,

( डॉ. संदीप राठोड )
उप कार्यकारी अधिकारी

---

## प्रसिध्दिसाठी

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिरात **माघ शुध्द प्रतिपदा ते माघ शुध्द सप्तमी** (दि. ३० जानेवारी, २०२५ ते ०४ फेब्रुवारी, २०२५) या होणाऱ्या माघी उत्सवाच्या उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने **मंगळवार, दि. २८ जानेवारी, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता,** श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर, पहिला मजला, प्रतिक्षालय इमारत येथे पत्रकार परिषद (Press Conferance) आयोजित करण्यात आली होती. यावेळी न्यासाचे मा. कोषाध्यक्ष आचार्य पवन त्रिपाठी, मा. विश्वस्त सर्वश्री. भास्कर शेट्टी, श्रीमती मनीषा तुपे, श्री. भास्कर विचारे, श्री. राहुल लोंढे, श्री. महेश मुदलीयार, श्री. जितेंद्र राऊत, श्री. सुदर्शन सांगळे हे उपस्थित होते.

सदर पत्रकार परिषदेत माघ गणेशोत्सवात आयोजित विविध सांस्कृतिक तसेच धार्मिक कार्यक्रमांबाबतची माहिती देण्यात आली. त्याबाबतची कार्यक्रम पत्रिका सोबत जोडली आहे. यासंबंधीची थोडक्यात रूपरेषा पुढीलप्रमाणे :–

दि. ३० जानेवारी, २०२५ ➡ पद्मश्री शंकर महादेवन यांचे गायन
➡ पद्मश्री शिवमणी यांचे ड्रमवादन

| | | |
|---|---|---|
| दि. ०१ फेब्रुवारी, २०२५ | ➡ | श्रीगणेश जन्म रोजी<br>श्री. सिध्देश मणेरीकर यांचे कीर्तन<br>दुपारी ०४: ०० वा. रथशोभायात्रा |
| रथशोभायात्रा मार्ग | ➡ | श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर एस. के. बोले मार्ग (आगर बाजार) (हनुमान मंदिर) ते गोखले मार्ग ( दक्षिण ), पोर्तुगिज चर्च, ( शंकर मंदिर ) दादर पोलीस स्टेशन, जाखादेवी चौक, सयानी रोड, (खेडगल्ली) (विठ्ठल रुक्मीणी मंदिर), सयानी रोड मार्ग, शंकर घाणेकर मार्ग, अप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी मंदिर, नवीन प्रभादेवी मार्ग ते प्रभादेवी मंदिराच्या बाजूने परत वीर सावरकर मार्ग ते श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर. |
| दि. ०४ फेब्रुवारी, २०२५ | ➡ | हवन करुन पूर्णाहूतीने सांगता. |

या कालावधीत दररोज “श्रीं” चे सामुहिक नामस्मरण केले जाणार.

तसेच यावेळी श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास व्यवस्थापन समिती यांनी खालीलप्रमाणे घेतलेल्या निर्णयांबाबत भाविकांना सूचना देण्यात येईल.

१. श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिरात “श्रीं” च्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी शालिनता जपणारे व मंदिराचे पावित्र्य राखले जाईल असे कपडे परिधान करून दर्शनासाठी यावे. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी तोकडे कपडे घालून आल्यास त्यांना प्रवेश दिला जाणार नाही.

असात्विक वेशभूषा जैसे कटी फटी जीन्स, स्कर्ट एवं अंगप्रदर्शक उत्तेजक, असभ्य, अशोभनीय वस्त्र पहनकर प्रवेश न करें।
भारतीय संस्कृति का पालन हो सके ऐंसे वेशभूषा मे ही दर्शन करे।
इन नियमो का पालन करके कृपया सहयोग करे।

२. तसेच महाराष्ट्र शासनाच्या प्लास्टिकमुक्त धोरणाच्या अनुषंगाने श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यासाकडून श्रीसिध्दिविनायक मंदिरातील प्रसादासाठी वापरण्यात येणारे प्लास्टिक पाऊच बंद करुन, पर्यावरणपूरक कागदी पाऊचचा वापर प्रायोगिक तत्वावर सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.